# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **23/09/2022**

**Brief of the work done :-**

भर दिवसा तीन लाख रुपये चोरणाऱ्या चोरट्यास शेलुबाजार येथून अटक ; पो.स्टे.मंगरूळपीर पोलीसांची कामगिरी.

## भरदिवसा तीन लाख रुपयांची रोकड पळवल्याच्या प्रकरणातील आरोपीस शेलुबाजार येथून अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलुबाजार** ■ भरदिवसा तीन लाख रुपयांची पिशवी अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना मंगरुळपीर शहरातील वर्दळीच्या ठिकाणी २७ जून रोजी घडली होती.या प्रकरणातील आरोपीस पोलिसांनी बुधवार २१ सप्टेंबर रोजी शेलुबाजार येथून अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी गजानन चिंतामण इंगळे,वय ७०,रा शहापूर

### २४ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी

यांनी पोलिसांत तक्रार दिली होती की, दिनांक २७ जून २०२२ रोजी दुपारी आसरा कृषी केंद्राजवळ मोटार सायकलवर मागे बसलेल्या इसमाने माझी तीन लाख रुपये असलेली पैशाची कापडाची पिशवी घेतली व पळुन गेले.अशा तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध कलम ३७९,३४ नुसार गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणाचा तपास एपीआय शिवचरन डोंगरे यांचे कडे असतांना दि २१ सप्टेंबर रोजी आरोपी विष्णू रामू वर्धन वय १८ रा शमशाबाद,हैद्राबाद यास चोरीच्या प्रयत्नात असतांना एपीआय शिवचरन डोंगरे, पोहेकॉ अमोल मुंदे,पोकॉ महम्मद परसुवाले,अनंता डौलसे यांनी शेलुबाजार येथून अटक केली आहे.ता २२ रोजी आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २४ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. (वार्ता.)